वाचा- १) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई--क्रमांक:जिपब-४१४/प्र.क्र.११२/ आस्था-१४,दिनांक- १५ मे २०१४.

२) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई--क्रमांक:जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/ आस्था-१४,दिनांक- ०२ जानेवारी २०१७

३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई--क्रमांक:जिपब-४८१७/प्र.क्र.७/ आस्था-१४,दिनांक- २७/२/२०१७

---

आदेश

जा.क्र.साप्रवि/रवका/आरआर/८०६/२०१७.
सामान्य प्रशासन विभाग,जि.प.जळगाव.
दिनांक- २४/०३/२०१७.

जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ वर्ग-४ च्या कर्मचा-यांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्यांच्या धोरणांची अंमलबजावणी संदर्भातील उपरोक्त संदर्भ क्रं. १ चे शासन निर्णयनुसार व संदर्भ क्रं. २ चे शासन शुध्दीपत्रका नुसार करणेबाबत निर्देश आहेत.

तसेच संदर्भ क्रं. ३ चे शासन निर्णयन्वये जिल्हा परिषदेच्या शिक्षकाच्या जिल्हातंर्गत बदल्यासाठी सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद,जळगाव यांनी कार्यवाही करावी.

तरी उपरोक्त शासन निर्णय व शुध्दीपत्रकातील निकष व सूचना काळजीपूर्वक लक्षात घेवून त्यानुसार सर्व संबंधित संवर्गाचे सन २०१७ मधील बदल्यांबाबत विहित मुदतीत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सर्व पंचायत समित्याकडील बदलीसाठी पात्र कर्मचा-यांच्या संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता याद्या संबंधित गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यावर, त्यानुसार जिल्हा परिषद स्तरावरून बदलीसाठी पात्र कर्मचा-यांची संवर्गनिहाय वास्तव्य सेवाजेष्ठता यादी संबंधित संवर्गनियंत्रक खातेप्रमुख यांनी तयार करावयाची आहे. सदर यादी प्रसिध्द करून ती सर्व तालुक्यात, जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात आणि जिल्हा परिषद च्या वेबसाईटवर अवलोकनार्थ ठेवण्यात यावी. सदर यादी पाहण्याबाबत व हरकती नोंदविण्याबाबत संबंधित कर्मचा-यांना अवगत करण्यात यावे. सदर यादी प्रसिध्द झाल्यापासून विहित मुदतीत त्यावर हरकती - आक्षेप नोंदवून घ्याव्यात. यासाठी मुख्यालयात विशेष नोंदवही ठेवून हरकती -आक्षेप नोंदवावेत आणि अंतिम यादी प्रसिध्द करावी.

या हरकती आक्षेपानुसार यादी अंतिम करण्याची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांची राहील त्यानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांनी संबंधित सर्व संवर्गाच्या याद्या अंतिम मान्यता देण्याकरीता, विहित मुदतीत संबंधित संवर्गाचे सर्व नियंत्रक अधिकारी/खातेप्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त संवर्गातील सर्व कर्मचा-यांची सदरचे शासन निर्णयातील नियम व निकषानुसार अचूक माहितीसह प्रस्ताव उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प. जळगाव यांचेकडेस विहित मुदतीत सादर करावेत, तसेच संबंधित सर्व संवर्ग नियंत्रक खातेप्रमुख यांनी त्यांचे कार्यालयाने तयार करून अंतिम प्रसिध्दीसाठी सादर केलेली माहिती नियमानुसार व निकषानुसार बरोबर असल्याचे प्रमाणपत्रदेखिल सदरचे माहिती/प्रस्तावासोबत द्यावे. सदरच्या तात्पुरत्या यादीमध्ये झालेली चूक संबंधित किंवा इतर कर्मचा-यांनी अथवा संबंधित कार्यालयाने निदर्शनास आणून न दिल्यास चुकीची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांचेवर रहाणार नाही.तसेच माहिती चुकीची व विहित मुदतीत सादर न केल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संवर्गनियंत्रक खातेप्रमुख व कार्यालये यांची राहील.

सदरचे शासन निर्णयातील निर्देशानुसार सर्व संबंधित बदल्यांसंदर्भातील कालावधी खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे.

## (अ) जिल्हा परिषद स्तरावरील बदल्यांसंदर्भात विहित वेळापत्रक-

| गट विकास अधिकारी संवर्गनिहाय वास्तव्य जेष्टता यादी ज्या त्या खाते प्रमुखास सादर करवयाचा दिनांक | संवर्गनियंत्रक अधिकारी /खातेप्रमुख यांनी त्यांचे संबंधित संवर्गाचे कर्मचा-यांचे वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कार्यालये/ वेबसाईट वर प्रसिध्द करण्याचा दिनांक. | संबंधितांनी हरकती/आक्षेप नोंदविण्याचा दिनांक | खातेप्रमुख यांनी वास्तव्य जेष्ठता यादी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांचेकडे मान्यतेसाठी व अंतिम करणेसाठी पाठविण्याचा दिनांक. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांनी खातेप्रमुख यांचेकडून प्राप्त यादी अंतिम करणेचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १२/०४/२०१७ पर्यंत | १७/०४/२०१७ | २७/०४/२०१७ पर्यंत | २/५/२०१७ | ५/५/२०१७ |

| कर्मचा-यांचे विनंती बदलीचे अर्ज स्विकृती व ग्राह्य धरणेचा विहित दिनांक. | कर्मचा-यांचे वास्तव्य सेवाजेष्ठता यादी तसेच विनंती अर्जाचे विहित यादी अंतिम केल्यावर रिक्त पदांचे स्थितीसह बदल्यांचे प्रस्ताव सा.प्र.वि.कडे पाठविण्याचा दिनांक. | अंतिम मान्यतेनंतर सर्व संबंधित बदल्यांचे आदेश निर्गतीचा दिनांक |
|---|---|---|
| ६ | ७ | ८. |
| १२/४/२०१७ | २/५/२०१७ | ३१/०५/२०१७ पुर्वी. |

## (ब) पंचायत समिती स्तरावरील बदल्यांसंदर्भात-वेळापत्रक-

| अ. नं | गट विकास अधिकारी यांनी त्यांचे संबंधित संवर्गाचे कर्मचा-यांचे वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कार्यालये/ वेबसाईट वर प्रसिध्द करण्याचा दिनांक. | संबंधितांनी हरकती/आक्षेप नोंदविण्याचा दिनांक | गट विकास अधिकारी यांनी वास्तव्य जेष्ठता अंतिम करुन व आक्षपाचे निराकरण करुन सेवा जेष्टता प्रसिध्द करणे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | १२/४/२०१७ | २२/४/२०१७ | ३० एप्रिल २०१७ |

| संबंधित कर्मचा-यांचे विनंती बदलीचे अर्ज स्विकृती व ग्राह्य धरणेचा विहित दिनांक. | अंतिम मान्यतेनंतर सर्व संबंधित बदल्यांचे आदेश निर्गतीचा दिनांक | सर्व संबंधित बदल्यांचे आदेश निर्गत केल्यानंतर संबंधित संवर्गनियंत्रक/ खातेप्रमुख यांना सर्व संबंधित प्रस्ताव/ माहितीच्या प्रतीसह अहवाल सादर करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| ५ | ६ | ७ |
| १२/०४/२०१७ पर्यंत | २५ मे पर्यंत | १/६/२०१७ पर्यंत |

२/- शासनाचे उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेप्रमाणे, एका विशिष्ट संवर्गातील बदल्या करण्यापुर्वी जिल्हा स्तरावरील बदल्यांसाठी म. अध्यक्ष जिल्हा परिषद जळगाव यांना बदल्या करण्याकरीता ठराविक तारीख देण्याची विनंती केल्यानंतर त्यांनी तशी तारीख दिल्यास त्यानुसार म. अध्यक्ष व संबंधित विषय समितीचे सभापती यांना व त्या संवर्गातील बदली करावयाच्या कर्मचा-यांना ठराविक दिवशी व ठिकाणी बदलीच्या प्रक्रियेसाठी एकत्र येणेबाबत लेखी कळवावे, याबाबतची कार्यवाही संबंधित विभागाने विहित मुदतीत करावी.

तसेच गट विकास अधिकारी यांचे स्तरावरील बदल्यांबाबत म. सभापती यांना बदल्या करण्याकरीता ठराविक दिनांक देण्याची विनंती केल्यानंतर त्यांनी तशी तारीख दिल्यास त्यानुसार गट विकास अधिकारी यांनी म.सभापती व उपसभापती यांना व त्या संवर्गातील बदली करावयाच्या कर्मचा-यांना ठराविक दिवशी व ठिकाणी बदलीच्या प्रक्रियेसाठी एकत्र येणेबाबत लेखी कळवावे, याबाबतची कार्यवाही गट विकास अधिकारी यांनी विहित मुदतीत करावी.

३/- बदल्यांसंदर्भात शासन निर्णयातील सर्व संबधित निकष व सूचनांची अंमलबजावणीबाबत विहित मुदतीत कार्यवाही पूर्ण करणेची व यासंदर्भात कोणतीही अनियमितता होऊ नये यासाठी सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी. सदरचे निर्णयाची अंमलबजावणीची सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित संवर्ग नियंत्रक खातेप्रमुख, सर्व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांची राहील याची नोंद घ्यावी. तसेच बदल्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन परिपत्रक/शासन निर्णयातील तरतुदी लक्षात घेवुन काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

टीप- <u>जिल्हा अंतर्गत वर्ग-३ वर्ग-४ च्या कर्मचा-याच्या बदल्या संदर्भात सदर आदेश निर्गमित केल्यानंतर शासनाने या संदर्भात नविन शासन निर्णय निर्गमित केल्यास त्यानुसार बदल्या करण्याबाबत आपल्या कार्यालयास अवगत करण्यात येईल याची नोंद घ्यावी</u>

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगाव

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर</u>- म. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक.
**प्रत माहितीस्तव सविनय सादर**- म. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सभापती विषय समिती जि.प. जळगाव .
प्रत- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव.
<u>प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी-</u>

१) सर्व विभाग प्रमुख, जिल्हा परिषद जळगाव.
२) सर्व गट विकास अधिकारी, / गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती जिल्हा जळगाव.
३) सर्व उपअभियंता जि.प. सिंचन / ग्रापापु. /बांधकाम उपविभाग .
४) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.सेवा योजना जिल्हा जळगाव.
५) सामान्य प्रशासन विभाग, आस्थापना- २,३,५,७,८,११,संगणक कक्ष, वाहने, जि.प. जळगाव.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगाव